# पिंपरी चिंचवड महानगरपालिका

ब-क्षेत्रिय कार्यालय, एल्प्रो कंपनी परिसर, लिंक रोड, चिंचवडगांव, पुणे-३३.

(नागरी व प्रशासकीय सेवेसाठी आयएसओ 9001:2008 प्रमाणपत्र प्राप्त संस्था)

Email – bward@pcmcindia.gov.in Website – www.pcmcindia.gov.in

दुरध्वनी क्रमांक – ०२०-२७३५०१५३

जावक क्र.-बक्षे/सभाशाखा/२/कावि/ २३७ /२०१६ दिनाक ०४ /०६ /२०१६

प्रति,

मा. श्री./श्रीमती-------------------------------------------,

प्रभाग क्र.--------------------------------------------,

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,

पिंपरी – ४११ ०१८.

विषय : ब प्रभाग समितीची मासिक सभा दि. ०७/०६/२०१६
रोजी आयोजित केलेबाबत.

महोदय/महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ब प्रभाग समितीची मासिक सभा मंगळवार दि. ०७/०६/२०१६ रोजी दु. १२.३० वाजता ब क्षेत्रीय कार्यालयाचे छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये आयोजित करणेत आली आहे. या पत्रासोबत सभेची कार्यपत्रिका पाठविण्यात येत आहे. तरी प्रस्तुत सभेस उपस्थित रहावे, हि विनंती

कळावे,

आपला विश्वासू

सही/-
प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
ब प्रभाग समिती

प्रत : सर्व संबंधित शाखा प्रमुख.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८

ब प्रभाग समिती सभा

कार्यपत्रिका क्र. ४

दिनांक : ०७/०६/२०१६. वेळ : दु. १२.३० वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ब प्रभाग समितीची मासिक सभा मंगळवार दिनांक ०७/०६/२०१६. रोजी दु. १२.३० वा. ब क्षेत्रीय कार्यालयाचे छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये आयोजित केली आहे. सभेत खालीलप्रमाणे कामकाज होईल.

अ) मागील कार्यपत्रिका क्र.१३, दि. १६/३/२०१६, व कार्यपत्रिका क्र.३, दि. १२/५/२०१६ रोजीच्या सभेचा सभावृत्तांत कायम करणे

विषय क्रमांक १ थेरगांव येथील स.नं.२२/५ मधील क्षेत्र १ हेक्टर ०० आर या मिळकतीचा आगाऊ ताबा पिंपरी चिंचवड मनपास अ, ब पत्राव्दारे ज्या जमीन मालकाच्या मालकीची जमीन त्यांनी आरक्षण क्रमांक ६२८ खेळाचे मैदानसाठी दिलेले आहे. सदर खेळाचे मैदानास कै.रामभाऊ मोरु बारणे व कै.बारकु मोरु बारणे असे नांव देवून नामकरण करणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे ( दिनांक १६/३/२०१६ रोजीच्या सभेतील निर्णयाप्रमाणे)

विषय क्रमांक २ चिंचवड-पिंपरी लिंकरोडवर हेरीटेज प्लॉझा ते ब प्रभाग कार्यालय मेन गेट पर्यंत चार चाकी व दोन चाकी गाडयांमुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होत असून, नागरीकांना प्रचंड त्रासाला सामोरे जावे लागत आहे. तसेच अपघाताचे प्रमाण वाढले आहे तरी त्या रस्त्याचे दोन्ही बाजूस नो पार्किंग झोन करावा किंवा सम विषम तारखेस पार्किंगची आखणी करावी व त्यास प्रशासकीय मान्यता देवू वाहतुक विभागास सुचना करण्याकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे ( दिनांक १२/३/२०१६ रोजीच्या सभेतील निर्णयाप्रमाणे)).

विषय क्रमांक ३ सन्मा.सदस्य सौ.झामाबाई बारणे, श्री.निलेश बारणे, सौ.विमलताई जगताप, श्री.संपत पवार व स्विकृत सदस्य श्री.गोरक्ष पाषाणकर यांनी दिनांक १७/५/२०१६ रोजीच्या मा.आयुक्त यांना दिलेल्या अर्जानुसार प्रभाग क्रमांक ५१ बेलठिकानगर लक्ष्मणनगर (गुजरनगर/गणेशनगर) येथील सबवेस मा.प्रभाग समिती ठराव क्र.६, दिनांक १८/६/२०१४,ठराव क्र.२९, दि.३०/१/२०१५, ठराव क्र.९, दि.१७/६/२०१५ अन्वये मंजूर करणेत आलेले सबवे नामकरणाचे ठराव रदद करुन सदर ठिकाणच्या सबवेला गुजरनगर असे नांव देणेबाबत आणि सदर नावाचा ठराव मंजूर होईपर्यंत किंवा प्रभाग समितीमध्ये योग्य तो निर्णय होईपर्यंत ठराव क्र.९ दि.१७/६/२०१५ रोजीच्या ठरावाची अंमलबजावणी न करता स्थगिती देणेबाबतच्या अर्जावर विचार करणे

विषय क्रमांक ४ मा.अध्यक्ष यांचे मान्यतेने येणारे ऐनवेळचे विषय.

सही/-

प्रशासन अधिकारी तथा

सचिव (सभाशाखा)

ब प्रभाग समिती

क्र.-बक्षे/सभाशाखा/२/कावि/ २३७ /२०१६

दिनाक – ०४ /०६ /२०१६